



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०२ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । २८/०४/२०२६ । पाने - ६




# संगमनेरात बागेश्वर व संजय गायकवाड यांच्या प्रतिमांना जोडे मारून निषेध



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संपूर्ण विश्वाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या तथाकथित भोंदूबाबा बागेश्वर व शिंदे सेनेचा आमदार संजय गायकवाड यांचा तीव्र निषेध करत संगमनेरमध्ये हजारो नागरिकांनी एकत्र येऊन त्यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन केले.

संगमनेर मधील सर्व पुरोगामी संघटना व मी संगमनेरकर यांच्या वतीने बागेश्वर उर्फ धीरेंद्र शास्त्री व शिंदे सेनेचा आ. संजय गायकवाड यांचा जोडे मारो आंदोलन करत तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, अनिकेत घुले, निखिल पापडेजा, वैष्णव मुर्तडक, सुभाष सांगळे, विजय पवार, रामेश्वर पानसरे, राम अरगडे, विजय उदावंत, अशोक सातपुते, आकाश कडलग, बाबासाहेब गायकर, तात्याराम कुटे यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. महाराजांचा जयघोष केल्यानंतर तथाकथित महाराज धीरेंद्र शास्त्री व शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या बेताल वक्तव्याचा (पान ४ वर)

## शिवाजी कोण होता ? पुस्तकाचे सामूहिक वाचन



**कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? हे पुस्तक छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व महाराजांचा सर्व धर्मांप्रती असलेला आदर, महिलांप्रती असलेला आदर, राजनीति आणि सध्याच्या परिस्थितीमध्ये शिव विचारांच्या जागर करणाऱ्यांना खऱ्या अर्थाने बोध देणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे विचार आणि सध्याचे शिवभक्त म्हणून घेणारे यांचे विचार यांनी काय बोध घ्यावा हे दर्शविले आहे. या पुस्तकाचे कोणतेही वाचन न करता शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी बेताल वक्तव्य केली आहेत. त्यांच्या या वक्तव्याचा संपूर्ण महाराष्ट्रातून निषेध होत असून हे पुस्तक खऱ्या अर्थाने घराघरात गेले पाहिजे हा विचार महाराष्ट्रात पुढे आला आहे. संगमनेर तालुका हा पुरोगामी विचारांचा आणि सर्वधर्मसमभाव आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे.** (पान ३ वर)

# गोदा-ते-नर्मदा जलयात्रेने जलव्यवस्थापनाबाबत जनजागृती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्रातील अनेक गावे आजही दुष्काळाच्या झळा सहन करत आहेत. या गावांतील पाणीटंचाई दूर होऊन राज्य दुष्काळमुक्त व्हावे, यासाठी गोदा ते नर्मदा या जलयात्रेच्या माध्यमातून जलव्यवस्थापना बाबत मोठी जनजागृती निर्माण होईल असा विश्वास आमदार गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केला.

**एका सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा तालुक्यातील जनतेच्या बळावर बलाढ्य शक्तीला पराभूत करून आमदार होतो आणि रात्रंदिवस जनतेसाठी काम करतो. अशा सक्षम लोकप्रतिनिधींच्या पाठीशी जनतेने भक्कमपणे उभे राहणे गरजेचे आहे. तालुक्यात आमदार अमोल खताळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने केलेले स्वागत पाहून आम्ही भारावून गेलो.**

**- गोपीचंद पडळकर (आमदार)**

संगमनेर शहरात या जलयात्रेचे आ. अमोल खताळ व महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने घुलेवाडी येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. घुलेवाडी फाटा, संगमनेर महाविद्यालय ऑरेंज कॉर्नर, गणेशनगर आणि बसस्थानक परिसरात ढोल-ताशांच्या गजरात तसेच बालवारकऱ्यांच्या टाळ-मृदंगाच्या निनादात जलयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. (पान २ वर)



# आपली बस, आपली सेवा

## एसटी महामंडळाची नवी मोहीम



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या जीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपली बस आपली सेवा या व्यापक मोहिमेच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासी संख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.

चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे. बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वतःची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणे-हा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल.

या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वतः घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणे-या साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील. तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाइन आरक्षणाचा स्वीकार ही आधुनिकतेकडे टाकलेली पावले ठरतील.

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या अनपेक्षित परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

# गोदा-ते-नर्मदा जलयात्रेने...

पान १ वरून - यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार पडळकर, माजी मंत्री सदाभाऊ खोत आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच चंद्रशेखर चौकातील श्रीराम मंदिरात मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. प्रवरामाईची आरती आमदार अमोल खताळ व त्यांची पत्नी नीलम खताळ, तसेच भाजप किसान मोर्चाचे राज्य सरचिटणीस रवींद्र थोरात व त्यांच्या पत्नी मीनाक्षी थोरात यांच्या हस्ते करण्यात आली. या प्रसंगी जलसंपदा विभागाचे अधिकारी व महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार पडळकर म्हणाले की, त्र्यंबकेश्वर येथून सुरू झालेल्या या जलयात्रेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे स्वतः वारकऱ्यांसोबत सहभागी झाले असून पुढील पाच दिवस ते या यात्रेत सहभागी राहणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जलव्यवस्थापन व लोककल्याण या दोन्ही क्षेत्रांत मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्यकाळात उभारलेल्या अनेक बारवांमध्ये आजही पाणी उपलब्ध आहे. त्यांच्या नावाने सुरू करण्यात आलेली ही जलयात्रा राज्यातील दुष्काळाची समस्या दूर करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .

# उष्माघाताने घेतला कळसच्या शेतकऱ्याचा बळी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील कळस येथील एका ४५ वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघातामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २६) दुपारी ३ वाजेच्या सुमारास संगमनेर येथे घडली. उष्माघाताचा अकोलेतील हा पहिला बळी ठरला आहे. दिगंबर जनार्दन वाकचौरे असे या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

गेल्या काही दिवसांपासून अकोले व संगमनेर तालुका तीव्र उन्हामुळे भाजून निघत आहे. सुमारे ४१ अंश सेल्सिअसपेक्षा पुढे तापमान जात आहे. या तीव्र उन्हामुळे मनुष्य जनावरांनाही अतोनात त्रास होत आहे. प्रशासन उन्हाच्या यलो अलर्टच्या सूचना देत आहे, मात्र वेगवेगळ्या कारणांमुळे लोक त्या सूचनांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहेत. भर उन्हात लोकांना घराबाहेर कामानिमित्त पडावे लागत आहे. त्यातच लग्नसराई सुरू असल्याने मिळेल त्या साधनाने लोक कार्यक्रमांना जात असतात. या अति उन्हामुळे शरीरावर विपरीत परिणाम होत आहे.

दिगंबर वाकचौरे हे भर उन्हात कळसहून मोटारसायकलवर संगमनेर येथे गेले होते. तेथील पानसरे हॉस्पिटल येथे बहीण ऑपरेशनसाठी उपचार घेत आहे म्हणून तिला भेटण्यासाठी गेलेले असताना उन्हाचा त्रास झाला. त्रास होऊ लागल्यामुळे डॉ. पानसरे यांच्या हॉस्पिटलसमोरील हॉटेलमधून त्याने पिण्यासाठी थंड पाण्याची बाटली विकत घेतली. उकाडा अधिक जाणवत असल्याने व त्रास होत असल्याने त्यांनी पाणी बाटली डोक्यावर ओतली. परंतु त्याला चक्कर येऊन तेथेच जमिनीवर कोसळले. त्यांना तात्काळ. रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. तेथे सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल ढगे यांनी तातडीने शहर पोलीस ठाणे व ग्रामीण रुग्णालयाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधला. याबाबत शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी कविता व मुलगा यश वाकचौरे असा परिवार आहे.

# संगमनेरमध्ये जनगणनेसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांच्या प्रशिक्षणाची जय्यत तयारी



युवावार्ता (प्रतिनिधी)


संगमनेर - २०२७ च्या पार्श्वभुमीवर संगमनेर नगरपरिषदेची शहरी भागाकरिताची यंत्रणा सज्ज झाली असून याकामी दि. २८ ते ३० एप्रिल २०२६ अखेर एक बॅच तसेच दि. ४ ते ६ मे २०२६ पर्यंत दोन बॅच याप्रमाणे एकूण तीन बॅचेसमध्ये दिगंबर गणेश सराफ विद्यालय, देवेंद्र अमृतलाल ओहरा कॉलेज, साईमंदिरा शेजारी, संगमनेर याठिकाणी जनगणना प्रगणक यांचेकरिता प्रशिक्षण आयोजीत केले आहे.

याकामी शहरी भागाकरिता एकूण ११६ प्रगणक व २० सुपरवायझर यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच चार फिल्ड ट्रेनरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. दयानंद गोरे, चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी भागात घरगणनेला सुरुवात होणार असून आगामी काळात प्रत्येक घरांची व कुटुंबाची नोंदणी केली जाणार आहे.

जनगणना कालावधीमध्ये प्रगणकांना अचूक माहिती मिळावी यासाठी २८ एप्रिल ते ६ मे २०२६ अखेर या कालावधीत एकूण तीन टप्प्यांमध्ये प्रशिक्षण पार पडणार आहे. जनगणना प्रशिक्षण कालावधीमध्ये तज्ञ प्रशिक्षक श्रीमती ज्योती आव्हाड, विशाल कोल्हे, प्रकाश पारखे तसेच किरण आल्हाट या तज्ञ मार्गदर्शकांकडून तांत्रिक बाबी व घरयादीबाबत माहिती भरणेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रत्यक्ष शहरी भागाकरिता काम करणारे प्रति ६ प्रगणक यांचेवर १ सुपरवायझरची नियुक्ती केली जाणार आहे. प्रशिक्षणानंतर १५ मे पासून प्रत्यक्ष घरगणनेला सुरुवात होणार असून सदरील घरगणना एक महिनाभर चालणार आहे. प्रत्येक प्रगणकावर साधारणपणे १८० ते २०० घरे किंवा ८०० ते ९०० लोकसंख्या मोजण्याची जबाबदारी असणार आहे.

दि. १ ते १४ मे २०२६ अखेर नागरिकांनी आपली स्वगणना करून घेणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. याकामी अधिकृत पोर्टलवर जाऊन आपला मोबाईल नंबर वापरुन लॉगीन करण्यात यावे. त्यानंतर तुमचे राज्य, जिल्हा आणि स्थानिक तपशिल निवडून डिजिटल नकाशावर तुमच्या घराचे स्थान चिन्हांकित करावे. त्यामध्ये आपल्या घर आणि कुटुंबाशी संबंधित माहिती भरावी. अर्ज भरल्यानंतर तुम्हाला ओटीपी मिळेल तो तुम्ही सुरक्षित ठेवावयाचा आहे. तसेच प्रगणक आपल्या घरी भेट देण्यास आल्यावर त्यांना सदरचा ओटीपी देण्यात यावा. प्रगणक सदरची माहीती पडताळणी करुन जतन करील. याप्रमाणे वेळेची बचत होऊन अचूक माहीती भरण्यास मदत होईल. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी स्वगणना करुन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आ. गायकवाडांमुळे "त्या" पुस्तकाची विक्रमी विक्री, छपाई पुन्हा सुरु




मुंबई (वृत्तसंस्था)

दिवंगत कॉ. गोविंद पानसरे यांनी ३७ वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून महाराष्ट्रात सध्या मोठे राजकीय वादळ उठले आहे. मात्र, या वादाचा एक अनपेक्षित परिणाम समोर आला असून, अवघ्या चार दिवसांत या पुस्तकाच्या १० हजारहून अधिक प्रतींची विक्रमी विक्री झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाच्या प्रकाशकाला जीवे मारण्याची धमकी दिल्यानंतर, सर्वसामान्यांमध्ये या पुस्तकाविषयीची उत्सुकता कमालीची वाढली आहे.

बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या नावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली होती. तुझे काय झाले ते पाहिले ना? तुला घरात घुसून मारेन, अशी धमकी देणारी ऑडिओ क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरल झाली. या प्रकारानंतर राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात आला आणि हे प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचले.

आमदार गायकवाड यांच्या धमकीनंतर या पुस्तकाची मागणी प्रचंड वाढली आहे. 'लोकवाङमय', 'श्रमिक प्रतिष्ठान' आणि 'साऊ प्रकाशन' यांसारख्या संस्थांकडे राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो ऑर्डर्स येत आहेत. गेल्या चार दिवसांत १० हजार प्रती विकल्या गेल्याने सध्या बाजारातील साठा संपला आहे. परिणामी, वाचकांची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रकाशकांनी नव्या आवृत्तीच्या छपाईचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.


# 'भोंदू' अशोक खरात प्रकरणात नवे धक्कादायक खुलासे उघड



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - धर्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप असलेला अशोक खरात याच्या अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. आधी ऑफिसबॉयने उघड केलेल्या धक्कादायक माहितीच्या पार्श्वभूमीवर आता त्याच्या फार्महाऊसवर काम करणाऱ्या कुकनेही खरातच्या काळ्या कारनाम्यांचा पर्दाफाश केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका चार्टर्ड अकाउंटंटने या कुकच्या माध्यमातून खरातच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवले होते. यामुळे फार्महाऊसवर घडणाऱ्या संशयास्पद घटनांची माहिती बाहेर आली. विशेष म्हणजे, या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज विशेष तपास पथकाच्या (डशिलळरश्र खर्पीर्शीीळसरींळेप ढशरा) हाती लागले असून, त्यातून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.या व्हिडिओमध्ये अशोक खरात महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याच्याविरोधातील लैंगिक शोषणाचे आरोप अधिक बळकट झाले आहेत. तपास अधिक खोलात जात असून, या व्हिडिओमधून आणखी गंभीर पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महिला अत्याचाराच्या सहाव्या गुन्ह्यात अटक झालेल्या खरात याची तीन दिवसांची पोलीस कोठडी आज संपत आहे. त्यामुळे त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. तपासादरम्यान रोज नवे खुलासे होत असल्याने आणि पुराव्यांची साखळी वाढत असल्याने, एसआयटीकडून पुन्हा पोलीस कोठडीची मागणी होण्याची शक्यता आहे.तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान अशोक खरात सहकार्य करत नसल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला प्रश्न टाळणारा खरात आता मला काही आठवत नाही असे सांगत असल्याचे सूत्रांनी नमूद केले आहे. यापूर्वीही डोकेदुखी आणि प्रकृती अस्वस्थ असल्याचे कारण देत चौकशी टाळण्याचा प्रयत्न केल्याची माहिती आहे.




# यंदा मान्सून लवकर धडकणार

## १८ ते २५ मे दरम्यान पावसाचे आगमन होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

एप्रिलमध्ये उन्हाच्या झळा आणि घामाच्या धारांनी बेजार झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक वार्ता आहे. नवीन संकेतानुसार मान्सून गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही मे अखेरीस दाखल होण्याची सुखद वार्ता मिळत आहे. युरोपीयन मध्यम श्रेणी हवामान अंदाज केंद्राने नवीन अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार, मान्सून अगोदर अंदमान-निकोबार बेटावर धडकेल. येत्या १८ ते २५ मे या कालावधीत पावसाचे आगमन होईल. एकीकडे महाराष्ट्रातच नव्हे, देशाच्या अनेक भागांत तापमान ४०-४४ डिग्रीपर्यंत पोहचले आहे. उत्तर, मध्य आणि पूर्वोत्तर भारत उष्णतेच्या लाटेत होरपळला आहे. तर अल-निनोमुळे यंदा मान्सून लांबण्याचा आणि पाऊस उशिरा येण्याचा दावा करण्यात येत होता. परिणामी शेतकऱ्यांसह सरकारही चिंतेत आले होते.

मात्र युरोपियन सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्टने म्हटले आहे की, गेल्या वर्षी म्हणजे २०२५ मध्ये २७ ते २९ मे दरम्यान भारतात मान्सून दाखल झाला होता. यावर्षीही मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून दक्षिण भारतात दाखल होऊ शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मे महिन्याच्या मध्यात अथवा अखेरीस अंदमान-निकोबार बेटासह दक्षिण भारतात पाऊस हजेरी लावेल. या पट्ट्यात ३० ते ६० मिमीहून अधिक पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. २५ मे ते १ जून या दरम्यान केरळ आणि तामिळनाडूच्या दक्षिण टप्प्यात पावसाचे आगमन होईल. यामुळे शेतीच्या कामांना वेग येण्याची शक्यता आहे. तर गरमी, उष्णतेने हवालदिल झालेल्या नागरिकांसह पशूपक्ष्यांना आणि प्राण्यांना मोठा दिलासा मिळेल.हवामान तज्ज्ञानुसार, सध्याचे सर्व हवामानाचे संकेत हे बंगालच्या खाडीत आणि अंदमानच्या समुद्रावरून दक्षिण-पश्चिम दिशेने वेगवान वारे दर्शवत आहेत. हेच वारे समुद्रावरून आर्द्रता घेऊन येते. या थंडगार वाऱ्यामुळे पावसाची शक्यता वाढते.









संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
● मेडिसिन ● सर्जरी
● स्त्रीरोग - प्रसुति
● मुळव्याध-भगंदर-फिशर
● लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# हवामान बदलावर मात करण्यासाठी कमी पाण्याची पिके घ्या - आ. अमोल खताळ



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

सध्याच्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे योग्य नियोजन करत कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याचे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी शेतकऱ्यांना केले. कृषी विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन येथे आयोजित खरीपपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके आदी अधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, बैठका केवळ कागदोपत्री न राहता त्यातील निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञान, कमी पाण्यात येणारी पिके व पर्यायी शेती पद्धती स्वीकाराव्यात. प्रगतशील शेतकऱ्यांचे अनुभव इतरांपर्यंत पोहोचविण्याचीही आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

कृषी अधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करावे तसेच बियाणे, खते व कृषी औषधांचा कृत्रिम तुटवडा होऊ नये याची काळजी घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नकली बियाणे व खत विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचेही त्यांनी सांगितले.

मागील वर्षी कमी पावसामुळे खरीप हंगामावर परिणाम झाल्याचा उल्लेख करत यंदाही पाणीटंचाईची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी विविध शासकीय योजनांची माहिती देत महाविस्तार ॲपचा अधिकाधिक वापर करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत कृषी अधिकारी अक्षय गोसावी यांनी प्रास्ताविक केले, तर संतोष डोंगरे यांनी युरोप अभ्यास दौऱ्याचे अनुभव मांडले.

# संगमनेरात शिवसेनेचे शासकीय कागदपत्र मार्गदर्शन व नोंदणी शिबिर उत्साहात




संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवारी (दि. २६ एप्रिल २०२६) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत संगमनेर शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शासकीय कागदपत्र मार्गदर्शन व नोंदणी शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये नागरिकांना विनामूल्य आधार कार्ड दुरुस्ती, मतदान ओळखपत्र दुरुस्ती, ई-श्रम कार्ड, आभा कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड तसेच विविध शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन हा उपक्रम राबविण्यात आला.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या शिबिराला जिल्हाप्रमुख सचिनभाऊ कोते पाटील आणि उपजिल्हाप्रमुख अमर भाऊ कतारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच खासदार संजय राऊत, खासदार अनिल देसाई, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सुनील शिंदे, विधानसभा संपर्कप्रमुख सूर्यकांत शिंदे, निरीक्षक झिशान चंगेज मुलतानी आदींच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. अलकानगर परिसरात आयोजित या शिबिराचे नेतृत्व शहरप्रमुख फैसल सय्यद व अमित चव्हाण यांनी केले. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांनी उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. आगामी काळात शिवसेनेचे सामाजिक कार्य अधिक बळकट करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच पक्षाचे विचार घराघरात पोहोचवून अधिकाधिक शिवसैनिक तयार करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या शिबिरात नागरिकांना रेशन कार्ड संदर्भातील नवीन १२ अंकी कोड, नाव समाविष्ट किंवा वगळणे, नवीन मतदार नोंदणी, एसआयआर नोंदणी आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या उपक्रमांतर्गत २५ नागरिकांना रेशन कार्डही वाटप करण्यात आले. उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी नागरिकांना मतदान नोंदणीचे महत्त्व पटवून देत शासनाच्या योजना या प्रत्येक नागरिकाचा हक्क असल्याचे सांगितले. शिवसेना नेहमीच जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहरप्रमुख फैसल सय्यद यांनी केले, तर अमित चव्हाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तालुकाप्रमुख भाऊसाहेब हासे, भीमाशंकर पावसे, वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख इम्तियाज शेख यांनीही उपक्रमाचे कौतुक केले. या शिबिरात सुमारे २५ नागरिकांना नवीन रेशन कार्ड मिळवून देण्यासाठी मदत करण्यात आली. एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने वेळेची बचत झाली, अशी भावना नागरिकांनी व्यक्त करत शिवसेनेचे आभार मानले. यावेळी शहरप्रमुख फैसल सय्यद, अमित चव्हाण, संघटक दीपक साळुंके, समन्वयक बाळासाहेब घोडके, माजी शहरप्रमुख पप्पू शेठ कानकाटे, विजय सातपुते, संभव लोढा, प्रकाश गायकवाड, कैलास गायके, नितीन पारखे, लिंगमूर्ती चिंता, अमोल डुकरे, भाऊसाहेब वराळे, परवेज शेख, इरफान सय्यद, जमीर करीम शेख, अजीम अत्तार, मुसा पठाण, नईम पठाण, इम्रान सय्यद, अतिक पटेल, मतीन शेख, शाहिद बेपारी, अकिब सय्यद, मोईन पिंजारी, रिजवान सय्यद, अरकान सय्यद यांच्यासह अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवड




संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

माळवाडी बोटा येथील श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जीनोम बायोटिक्स या नामांकित कंपनीमध्ये आयोजित मुलाखत प्रक्रियेत आर्यन मोरे, निखिल निघोट, रोहन गपट, रुत्विक हांडे, शिवम राऊत, केतन बिबवे आणि साहिल वामन, एकूण ७ विद्यार्थ्यांची प्रोडक्शन ऑफिसर म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून, या यशामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असलेल्या कटिबद्धतेची प्रचिती येते.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पोखरकर, सचिव डॉ. अमित पोखरकर, प्राचार्य डॉ. सांगळे तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर वाकचौरे सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME AYYUB FAKIRBHAI BAGWAN

TO NEW NAME AS AYYUB FAKIRMOHAMMED BAGWAN

ADD- SANGAMNER KHURD, TAL - SANGAMNER, 422605

# आढळा डाव्या कालव्याला पाणी

## संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा

संगमनेर

(प्रतिनिधी)-

आढळा लाभ क्षेत्रात येणाऱ्या संगमनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याअभावी शेतपिके करपण्याच्या मार्गावर आली होती. याबाबत चिकणी येथील ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिल्यानंतर आढळा डाव्या कालव्याला पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आढळा लाभ क्षेत्रातील अनेक गावांमध्ये सध्या तीव्र उष्णतेमुळे पिकांची अवस्था बिकट झाली होती. पाण्याअभावी पिके वाळत असल्याने शेतकरी चिंतेत होते. विशेषतः चिकणी आणि वडगाव लांडगा परिसरातील शेतकऱ्यांनी पिके वाचवण्यासाठी तातडीने कालव्याला पाणी सोडण्याची मागणी केली होती. दरम्यान, गोदा ते नर्मदा जलयात्रा आश्वी परिसरात असताना आमदार खताळ यांनी ही गंभीर बाब जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मंत्री विखे पाटील यांनी तत्काळ आढळा डाव्या कालव्याला पाणी सोडण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यानंतर जलसंपदा विभागाने तातडीने कार्यवाही करत आढळा धरणाच्या डाव्या कालव्याला पाणी सोडले. कालव्याला पाणी मिळाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून पिकांना जीवदान मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहेत.

**ड्रायव्हर पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा

मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा

निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

8668269897

# शिवाजी कोण होता ? पुस्तकाचे...

पान नं. ०१ वरुन- माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका एक परिवार म्हणून सातत्याने हा तालुका राज्यात विकासातून अग्रगण्य बनवला. संपूर्ण राज्याला दिशा देणारा संगमनेर तालुका असून हजारो नागरिकांनी एकत्र येऊन या पुस्तकाचे वाचन केले. यावेळी बोलताना माजी आमदार डॉ.तांबे म्हणाले की, शिंदे सेनेचे आमदाराने केलेल्या वक्तव्याचा संपूर्ण महाराष्ट्राने खऱ्या अर्थाने निषेध केला पाहिजे आणि उपमुख्यमंत्र्यांनी तातडीने त्यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे. असभ्य आणि गुंडगिरी असलेले हे लोक महाराष्ट्राच्या सभागृहात कसे जातात असा सवाल त्यांनी विचारला असून सर्वसामान्य जनतेने आता जागरूक व्हायला पाहिजे. बहुजनांमध्ये बुद्धिमान लोक नाहीत हे दाखवण्यासाठी काही विशिष्ट प्रवृत्ती इतिहास बदलण्याचे काम करत असल्याचे ते म्हणाले. तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगाचे आराध्य दैवत आहे. महाराजांना दहा वर्ष आयुष्य अजून मिळाले असते तर संपूर्ण जगावर त्यांनी राज्य केले असते. महिला सन्मानाचा,समानतेचा विचार महाराजांनी दिला आहे.

# संत विचारांची मौलिकता...

संतांच्या परीसस्पर्शाने ही भारतभूमी पावन झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, संत गोरा कुंभार, संत कान्होपात्रा, संत नामदेव, संत रोहिदास, संत रामदास, संत एकनाथ, संत नरहरी सोनार, संत सेना महाराज, संत सावता माळी अशा अनेक महान संतांची परंपरा आपल्या भारतभूमीला लाभलेली आहे. संत परंपरेची मौलिकता ही त्यांच्या मानवी दृष्टिकोनात, समतेच्या तत्त्वावर आणि व्यवहारिक अध्यात्मात दडलेली आहे. निवृत्तीवादापेक्षा प्रवृत्तीवादी जीवनशैलीवर त्यांनी भर दिला. त्यांनी दिलेली शिकवण, प्रेरणा आजही आपल्याला जीवन जगताना योग्य मार्ग दाखवत असते. कर्म हेच पूजा आणि हीच खरी भक्ती आहे, असा संदेश संतांनी दिला. पंढरपूरचा विठ्ठल हे प्रेमाचे आणि समतेचे प्रतीक मानून वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून भक्ती आणि श्रद्धेचा असा सोपा मार्ग संतांनी दाखवला.

आजच्या या धकाधकीच्या जीवनात राग, द्वेष, स्वार्थ, हव्यास या सर्वांची परिसीमा झालेली आहे. आपल्या आयुष्यात नक्की काय चाललंय? आपल्याला काय हवं आहे? काय मिळवायचं आहे? याचा विचार करायलाही माणसाकडे वेळ नाहीये. पैसा, प्रसिद्धी, नोकरी, उच्च जीवनशैली या सर्वांमागे धावता धावता माणूस खरंच जगायचं विसरलाय का? या सोबतच आपल्याला ज्या अंधश्रद्धेने पोखरलं आहे, ते तर सुन्न करण्यासारखं आहे.

आजच्या या झपाट्याने बदलत जाणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगातील सुशिक्षित समाज हा श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक न समजता अंधभक्त होऊन अंधश्रद्धेचा बळी ठरतो आहे. अक्षरशः सामान्य जनतेसह, उच्चपदस्थ अधिकारी, राजकीय नेते, सरकारी अधिकारी हे सुद्धा बळी पडत आहेत. विशेष म्हणजे अशा भोंदूंच्या जाळ्यात अडकून अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण देखील खूप आहे. आजकाल तर आपल्या शेजारी, गल्लीबोळात आपल्या प्रश्नांचं, समस्यांचं समाधान करून देतो असे सांगणारे पावलोपावली भेटतात. शंभर रुपये घेऊन एका प्रश्नाचे उत्तर दिलं जातं, आणि आम्हीही त्यात समाधानी असतो, हे नेमकं कशाचं द्योतक आहे?

संतांची शेकडो वर्षांची अखंड परंपरा लाभलेली ही आपली भूमी, त्यांचे विचार,



त्यांची शिकवण खरंच आपण विसरलो आहोत का? आता आपल्याला या गोष्टींचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. मनुष्य हा नेहमीच आलेल्या परिस्थितीशी झगडत असतो. आहे ते न स्वीकारता त्यापेक्षा त्याला वेगळं काहीतरी अपेक्षित असतं, त्यामुळेच नेहमीच त्याची घालमेल होत असते. आणि मग गल्लीबोळात बसलेले भोंदू याच परिस्थितीचा गैरफायदा घेतात. आपल्या आयुष्यात असलेल्या प्रत्येक समस्येचं उत्तर ह्या बाबांकडे आहे, असा आपला गैरसमज असतो. हे पसरवणाराही आपलाच समाज आहे. परंतु, इथे वेळीच शहाणे नाही झालं, तर काय होऊ शकतं याचं जिवंत उदाहरण म्हणजे भोंदू खरात बाबा याच्या रूपाने आपल्यासमोर आहे. या प्रकरणाने खरंतर महाराष्ट्रातील संत परंपरेला आणि श्रद्धेला गालबोट लागले आहे. अनैतिकता, अंधश्रद्धा, शोषण, विकृती, फसवणूक या सगळ्यांचा उच्चांक भोंदू खरात बाबा या प्रकरणातून समोर आला आहे. आपल्या अनैतिक, अधार्मिक आणि विकृत दुष्कृत्यांना श्रद्धेचा आणि दैवी चमत्कार यांचा आधार घेत समाजमन कलुषित करण्याचे पाप या निमित्ताने केला आहे.

महाराष्ट्र ही शिवबांची, संतांची आणि पुरोगामी विचारांची भूमी आहे. खरंतर आपल्या संतांनी अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये स्वतः भक्तीच्या मार्गाने जाऊन आपल्या आयुष्याचं सोनं केलं, आणि संपूर्ण समाजाला हा अध्यात्माचा, ज्ञानाचा, भक्तीचा, समतेचा आणि श्रद्धेचा मार्ग दाखवला. श्री संत ज्ञानेश्वर यांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. कर्मकांडाला त्यांनी प्रखर विरोध केला. स्वधर्माचे पालन करण्यावर त्यांनी भर दिला. हे विश्वची माझे घर असे सांगून त्यांनी एकात्मतेचा संदेश दिला. भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथी हाणू काठी, खरंच अशा नाठाळयांच्या माथी आज काठी हाणण्याची वेळ आलेली आहे. पण त्यासाठी समाजाने जागृत राहणं गरजेचं आहे.

जाखाई जाखाई रंडी चंडी । नवसे कन्या पुत्र होती ।
तरी का करणे लागे पती ।
काय कळे तो मूर्ख जना ।
तुका म्हणे वेड्या मना ।

अज्ञानी लोक कर्मकांडावर विश्वास ठेवून कसे स्वतःला फसवतात, हे तुकाराम महाराज आपल्या अभंगातून सांगतात. आपल्या अभंगातून त्यांनी सामान्य माणसाला जगण्याची दिशा दाखवली. संत एकनाथांनी समता, बंधुता, प्रेम यांची शिकवण दिली. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी भारुड, पद्यरचना केल्या. संत नामदेव यांचे अनेक वचन गुरु ग्रंथ साहेब या शीखांच्या पवित्र ग्रंथांमध्ये आहेत. नाचू कीर्तनाची रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।। हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. संत सेना महाराज म्हणतात, धन कोणा कामा आले । पाहा विचारूनी भले । ऐसे सकळ जाणती, कळून या आंधळे होती ।. आपल्या संतांनी कोणतेही कर्मकांड न करता निस्सीम भक्तीच्या आधारावर आपल्या जीवनाला परमात्म्याबरोबर जोडले. आपल्या अभंग, वाणी, कीर्तन, भारुडे, पद्य या सर्वांतून त्यांनी जगण्याचा, सद्भावनेचा, सत्कृत्याचा, विवेकशीलतेचा आणि सत्कर्माचा नवीन मार्ग दाखवला. संत रामदास यांनी आपल्या दासबोध तसेच मनाचे श्लोक या पद्यातून जीवन जगताना कसे जगावे, हे सांगितले.

संतांनी दिलेली शिकवण आपल्याला हेच सांगते, की मनुष्य जीवनामध्ये सुख हे भौतिक वस्तूत नसून समाधानात आहे. साधे राहणीमान, प्रामाणिकपणा, संयम, गरजूंना मदत करणे, बाह्य कर्मकांडाऐवजी मनाच्या शुद्धतेवर आणि आत्मजागृतीवर विश्वास ठेवणे, या गोष्टींची आज आपल्याला खरंच एक सुशिक्षित समाज म्हणून गरज आहे. संतांची मौलिक शिकवण नेहमीच आपल्याला आपला हात धरून योग्य मार्ग दाखवण्याचे काम करत आहे. संतांनी फक्त अध्यात्मिकता न सांगता माणसाचे जीवनकौशल्य कसे असावे, तेही सांगितले आहे. खरंच, आजच्या तरुण पिढीने आपल्या जीवनामध्ये या कौशल्यांचा अंतर्भाव करून ती विकसित करणे ही काळाची गरज आहे. संतांच्या शिकवणीचा आपल्या आयुष्यामध्ये अंमलबजावणी केली, तर नक्कीच त्यांचं आयुष्य हे यशस्वी आणि समाधानी असेल, यात कोणतीच शंका नाही. समाजाचे रक्षण करणे आणि सर्वाभूती समदृष्टी ठेवणे, ही संत परंपरेची खरी मौलिकता आहे.



**प्रा. सुरेखा रहाणे,**
संगमनेर महाविद्यालय
संगमनेर (९०९६४६६७७३)

# संपादकीय...

## हवामान बदलाचा वाढता कहर

सध्या जगभरात हवामानातील बदल ही केवळ चर्चा राहिलेली नसून ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाला स्पर्श करणारी गंभीर वास्तवता बनली आहे. पूर्वी ऋतूंचे ठरलेले चक्र होते, त्यानुसार शेती, उद्योग आणि जीवनशैली ठरत असे; मात्र आता या सर्व गणितांचा ताळमेळ बिघडलेला दिसतो. तापमानातील अनियमित वाढ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि चक्रीवादळे यांसारख्या घटनांनी सर्वच क्षेत्रांना मोठा फटका बसत आहे. विशेषतः कृषी क्षेत्रावर या बदलांचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत असून, शेतकरी वर्ग अस्थिरतेच्या गर्तेत सापडला आहे. एप्रिल महिन्यातच तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेलेले दिसते. विदर्भातील काही भागात तर ४२ ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमानाची नोंद होत आहे. या प्रचंड उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. उष्माघात, रक्तदाब वाढणे, चक्कर येणे, डोळ्यांचे विकार, शरीरातील पाण्याची कमतरता अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. काही वेळा या परिस्थितीमुळे जीवितहानीही होत आहे. काही वर्षांपूर्वी खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात उष्माघातामुळे झालेली जीवितहानी अजूनही समाजाच्या स्मरणात ताजी आहे. त्यामुळे उष्णतेचा धोका किती गंभीर आहे, याची जाणीव होते. दुसरीकडे, उन्हाळ्याच्या तीव्रतेदरम्यानच राज्यातील काही भागांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचे प्रमाण वाढलेले दिसते. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांतही देशातील विविध भागांत अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त केली जाते. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. फळबागा उद्ध्वस्त होतात, उभे पीक जमीनदोस्त होते आणि वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरते. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो आणि त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. अशा परिस्थितीत शेती करणे अधिकच जोखमीचे ठरते. हवामानातील ही विषमता अधिक चिंताजनक आहे. एका भागात कडाक्याचे ऊन असताना दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस कोसळत असतो. ही असंतुलित परिस्थिती केवळ भारतापुरती मर्यादित नसून जगभरात दिसून येते. पूर्वी ऋतूंचे वेळापत्रक निश्चित असायचे, पण आता पावसाळ्यात पाऊस पडत नाही आणि उन्हाळ्यात अवकाळी पाऊस होतो. कधीकधी काही दिवसांतच महिन्यांच्या सरासरीइतका पाऊस पडतो, तर काहीवेळा दीर्घकाळ दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे, याबाबत शेतकरी संभ्रमात पडतो. या अनिश्चिततेमुळे काही शेतकऱ्यांनी शेतीपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आहे, ही बाब अधिक चिंतेची आहे. या बदलामागे मानवनिर्मित कारणेही तितकीच जबाबदार आहेत. गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाली आहे, शहरांमध्ये कॉँक्रीटीकरण वाढले आहे आणि पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. शहरे सिमेंटच्या जंगलात रूपांतरित होत असताना नैसर्गिक संतुलन ढासळले आहे. झाडांची संख्या घटल्यामुळे वातावरणातील तापमान वाढत आहे आणि पर्जन्यमानातही अनियमितता येत आहे. निसर्गाशी केलेल्या या हस्तक्षेपाचे दुष्परिणाम आता स्पष्टपणे जाणवत आहेत. बदलत्या हवामानाचा परिणाम केवळ मानवावरच नाही, तर संपूर्ण जीवसृष्टीवर होत आहे. जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे, अनेक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पाणीटंचाई, अन्नटंचाई आणि आरोग्याच्या समस्या यामुळे भविष्यातील संकटे अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही समस्या केवळ पर्यावरणीय नसून सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयकही आहे. या परिस्थितीत केवळ शासन किंवा तंत्रज्ञानावर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येकाने स्वतःची जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. वृक्षतोड थांबवणे, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे आणि ती झाडे जपणे ही काळाची गरज आहे. पाणी, वीज आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. शाश्वत जीवनशैली स्वीकारून निसर्गाशी सुसंगत राहणे हीच भविष्यासाठीची दिशा ठरू शकते.

# जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उन्हाळी बालसंस्कार शिबिराचा रंगतदार समारोप



()-

कै. शंकरराव शेवाळे पाटील ट्रस्ट संचलित जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दिनांक १६ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ या १० दिवसांच्या कालावधीत उन्हाळी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समारोप दिनी कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यंदा शिबिराचे हे ११वे वर्ष असून संपूर्ण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. पहिल्या दिवशी शिबिराच्या प्रवेशद्वारावर कार्टून कॅरेक्टर्सच्या माध्यमातून चिमुकल्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दररोजच्या परिपाठात जिजाऊ वंदना, संस्कृत श्लोक पठण यांचा समावेश होता. तसेच दररोज किट व डान्सची तयारीही करण्यात येत होती. त्यानंतर शिबिराचा अहवाल वाचन (इंचार्ज) प्राची मॅडम यांनी केले.

१७ एप्रिल २०२६ रोजी मुलांना रेंगे गार्डन येथे सहलीसाठी नेण्यात आले. हिरवळ, विविध प्रकारची झाडे-फुले आणि आनंददायी वातावरण अनुभवत चिमुकल्यांनी मनमुराद आनंद लुटला. त्याच दिवशी मुलांनी क्लेपासून मातीची भांडी व गणपतीच्या सुंदर मूर्ती तयार करून आपली सर्जनशीलता दाखवली. १९ एप्रिल २०२६ रोजी स्पंज प्रिंट व थ्रेड ॲक्टिव्हिटीद्वारे मुलांनी रंगांची आणि कल्पनाशक्तीची सुंदर मेजवानी अनुभवली. २० एप्रिल २०२६ रोजी ब्लॉक्सपासून मनोरे तयार करणे तसेच आईस्क्रीम कँडी बनविणे अशा उपक्रमांमधून मुलांनी आनंद घेत शिकण्याचा अनुभव घेतला. २१ एप्रिल २०२६ रोजी पपेट शोचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून मुलांचे मनोरंजन तर झालेच, पण त्याचबरोबर त्यांना नैतिक मूल्यांचा संदेशही मिळाला.

२२ एप्रिल २०२६ रोजी नेहरू गार्डन येथे सहल आयोजित करण्यात आली. निसर्गरम्य वातावरण, विविध वनस्पती आणि हिरवळ पाहून मुलांना निसर्गाशी जवळीक साधण्याची संधी मिळाली. २३ एप्रिल २०२६ रोजी सिद्धी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मॅजिक शो सादर करण्यात आला. जादूच्या करामतींनी मुलांना आश्चर्यचकित करत आनंदाचा वर्षाव केला. २४ एप्रिल २०२६ रोजी रेन डान्सचे आयोजन करण्यात आले. कृत्रिम पावसात मुलांनी मनसोक्त नृत्य करत जल्लोष साजरा केला. २५ एप्रिल २०२६ रोजी ऑटो रिक्षा सफरीचे आयोजन करण्यात आले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून मुलांनी शहरातील विविध ठिकाणांचा अनुभव घेतला. मुलांच्या उत्तम आरोग्याचा विचार करून शिबिरात सकस व पौष्टिक आहार देण्यात आला.

शिबिरातील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना टी-शर्ट देऊन सन्मान करण्यात आला. शिबिरासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या शिबिराला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेवटच्या दिवशी पालक प्रतिनिधी म्हणून सौ. माधुरी पगारे, अरुण सस्कर व सौ. कविता गवांदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या शिबिरामुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले असून अभ्यासासोबतच बाह्यज्ञानही वाढले आहे. मुलांचा आनंद पाहून समाधान वाटले. असे शिबिर दरवर्षी आयोजित करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. उन्हाळी बालसंस्कार शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन, प्रशासन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## संगमनेरात बागेश्वर व...

पान १ वरुन - सर्व तरुणांनी जाहीर निषेध केला. दरिंदर शास्त्री व बेताल संजय गायकवाड यांचा जाहीर निषेध असो अशा घोषणा दिल्या.यावेळी जोडे मारो व त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, कुणी कितीही मोठा महाराज स्वतःला म्हणून घेत असला परंतु छत्रपती शिवाजी महाराजांइतका कोणीही मोठा होणार नाही. उत्तर भारतातून काही लोक येऊन महाराष्ट्राची संस्कृती खराब करण्याचा प्रयत्न करत आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा फुले व आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. शूर वीरांचा महाराष्ट्र आहे. संतांचा आणि समाजसेवकांचा वारसा या मातीला लाभला आहे. महाराजांबद्दल चुकीचे वक्तव्य करत असताना त्या व्यासपीठावर आरएसएस आणि महायुतीचे मोठे नेते उपस्थित होते. अशा वेळी त्यांनी एक शब्दही बोलू नये हे अत्यंत दुर्दैवी आहे. महाराजांच्या महाराष्ट्रात आशा वक्तव्यांना माफी नाही. असे सांगताना छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा विचार घराघरात पोहोचवण्यासाठी युवकांनी काम करावे असे आवाहन त्यांनी केले. तर मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचा सुभेदार असलेल्या संजय गायकवाड यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे.वाचन नाही कोणतीही माहिती नाही. असे असताना महाराष्ट्रामध्ये द्वेषभावना वाढीस लावण्याचे काम ही मंडळी करत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कायम महिलांचा सन्मान केला आणि हे आमदार महोदय प्रकाशकाच्या आई आणि भगिनींबद्दल जे बोलले ते अत्यंत निंदनीय आहे. बागेश्वर सारखा स्वयंघोषित महाराज महाराष्ट्रात येऊन खोटे बोलत आहे. खोटा इतिहास आपल्यावर लादण्याचा प्रयत्न केला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर यांचे महत्त्व कमी करण्यासाठी काही कपटी प्रवृत्ती कट कारस्थान करत आहेत. हिंदू धर्म हा समता सांगणार आहे. परंतु या लोकांना वर्णव्यवस्था अभिप्रेत असून बहुजनांना गुलामीत ठेवायचे आहे म्हणून बहुजनांनी जागृत झाले पाहिजे. बहुजनांचेच मुलं त्यांचे अनुयायी होत असल्याची खंत व्यक्त करताना या लोकांचा हेतू चांगला नाही हे बहुजनांच्या मुलांनी समजून घ्यावे असे ते म्हणाले. यावेळी बागेश्वर व संजय गायकवाड यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. या निषेध मोर्चासाठी संगमनेर मधील सर्व पुरोगामी संघटना,राजकीय संघटना,सेवाभावी संघटना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, आरपीआय, दलित पँथर, सत्यशोधक विचार मंच, छात्र भारती विद्यार्थी सेना, महिला काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष, यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होत


**SANGAMNERHATMAGVINKARCO.OP.HOUSINGSOCIETYLTD. BALAJI MANDIR AT PADMANAGAR, TAL - SANGAMNER, DIST -AHILYANAGAR**

**TENDER NOTICE**

Sealed competitive tender in B-1 Form for the following work is invited by the Sangamner Hatmag Vinkar Co. Op. Housing Society Ltd Balaji Mandir at Padmanagar ,Tal Sangamner, Dist. Ahilyanagar from registered contractors ,registered in appropriate class with Civil / Department of PWD, for work in two envelope system as details below. Blank tender forms will be issued from office of "Ravi pansare Associate", Krishidhan shopping complex Market Yard , Nashik–Pune Highway, Sangamner during office hours on paying tender cost form from Date :- 27/04/2026 to 04/05/2026. Sealed tenders will be received in the office of "Ravi pansare Associate", Krishidhan shopping complex Market Yard , Nashik–Pune Highway, Sangamner upto 12/05/2026 till 6.00 p.m. Sealed tenders will be opened on 05/05/2026 at 11.00 a.m. in the Office of "Ravi pansare Associate", Krishidhan shopping complex Market Yard , Nashik–Pune Highway, Sangamner in presence of Contractors or their authorized representative..

| Sr. No. | Name of Work | Estimated Cost Rs | Earnest Money Rs | Cost of Tender Rs | Period of Tender | Class of Contractor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Building Construction (Only Civil Works) for Sangamner Hatmag Vinkar Co. Op. Housing Society Ltd. Balaji Mandir at Padmanagar, Tal Sangamner, Dist. Ahilyanagar . | 38,90,444 /- (Thirty Eight Lakh Ninety Thousand Four Hundred Forty Four Only) | 20,000 /- | 3000 /- | 6 Months Including mansoon | V A |

1. Right to reject any or all tenders without assigning any reason there of is reserved by competent authority whose decision is final and legally binding on tenderer. 2. Detail tender notice can be seen in the office of Ravi pansare Associate", Krishidhan shopping complex Market Yard , Nashik–Pune Highway, Sangamner. 3. Registration Certificate of appropriate class, Income-Tax Certificate certified copy should be shown while purchasing the blank tender form and enclosed with tender form. 4. Last date of application for purchasing blank tender form is 04/05/2026. 5. Earnest Money should be deposited in cash in the office of Sangamner Hatmag Vinkar Co. Op. Housing Societies Balaji Mandir at Padmanagar ,Tal Sangamner, Dist. Ahilyanagar the receipt will be attached with tender. 6. Conditional tender will not be considered.

RAVINDRA PANSARE
RAVI PANSARE ASSOCIATES
Sangamner

CHAIRMAN/SECRETARY
Sangamner Hatmag Vinkar Co. Op. Housing Society,Sangamner



SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
TAISIN HARUN BAGWAN
TO NEW NAME AS
TISEEN KHALIL BAGWAN
ADD- SANGAMNER KHURD, TAL - SANGAMNER, 422605

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH AZHAR YUNUS
TO NEW NAME AS
AZHAR YUNUS BAGWAN
ADD- SANGAMNER KHURD, TAL - SANGAMNER, 422605

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SUNIL RAMNATH GORDE
TO NEW NAME AS
SUNI RAMBHAU GORDE
BY AFFIDAVIT NO - 438/2026 DATE 27/04/2026
AT - SAYKHINDI, POST - CHIKANI, TAL - SANGAMNER, DIST. AHILYANAGAR, MAHARASHTRA



CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी


We Are Hiring SANGAMNER
Marketing Team
SLH Tax Advisors Pvt Ltd
Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)
Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)
Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)
Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)
Salary + Incentives
Fast Growth Opportunity
Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner
Call/WhatsApp- 7264804000



भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला १२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स,दिल्ली नाका संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
बी.बी.ए./ एम.बी.ए. प्राधान्य
8999862759

पाहिजेत
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल अँड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते–वाघापूर, ता. संगमनेर, जि– अहिल्यानगर
9657230023

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

हेल्पर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846








दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी




# एकाच दिवशी रोखले दोन बालविवाह

## संगमनेर तालुक्यात प्रशासनाची तत्पर कारवाई




संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

प्रशासनाने सतर्कता दाखवत रविवारी संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दोन गावांमध्ये होत असलेले बालविवाह रोखले. संबंधित दोन्ही अल्पवयीन मुलींचे वय साधारण १७ वर्षे इतके आहे. त्यातील एकीचा विवाह २६, तर दुसरीचा विवाह २४ वर्षे इतके वय असलेल्या युवकाशी लावण्याची तयारी सुरू होती.

अहिल्यानगर जिल्ह्यात स्नेहालय संचलित उडान प्रकल्प आणि स्थानिक प्रशासन, पोलिस प्रशासनाच्या कारवाईतून दोन अल्पवयीन मुलींचे बालविवाह रोखण्यात यश आले, अशी माहिती स्नेहालय उडान प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी दिली. २६ एप्रिलला उडान प्रकल्पाच्या हेल्पलाइनवर दोन वेगवेगळ्या ठिकाणी बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कदम आणि सामाजिक कार्यकर्त्या सीमा कौर जुनी यांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधत ग्रामसेवक व बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तसेच पोलिस हेल्पलाइन ११२ वर माहिती दिली. पहिला विवाह दाढ खुर्द येथे आणि दुसरा संगमनेर खुर्द येथे होणार असल्याचे स्पष्ट झाले. माहिती मिळताच पोलिस यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहोचली.

सुरुवातीला संबंधित कुटुंबीयांनी हा केवळ साखरपुडा असल्याचे सांगून कारवाई टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र उडान प्रकल्पाच्या टीमने योग्य कायदेशीर मार्गदर्शन केले. परिणामी, साखरपुडाही भावविण्यात आला. दुसऱ्या प्रकरणात ग्रामसेवक सुनील नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक ग्राम बाल संरक्षण समिती, तिचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सहकार्याने आणि स्नेहालय उडान प्रकल्पाच्या समन्वयातून बालविवाह रोखण्यात यश आले. स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि सामाजिक संस्थांचा समन्वय हा निर्णायक ठरला.

# 'डॉ. मैथिली' ते 'नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे'



संगमनेरच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर जेव्हा एखाद्या कर्तृत्ववान नेतृत्वाचा उल्लेख होतो, तेव्हा डॉ. मैथिली सत्यजीत तांबे हे नाव आदराने घेतले जाते. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आतापर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे संवेदनशीलता आणि शिस्त. यांचा संगम लाभलेले हे नेतृत्व संगमनेरच्या विकासाला नवी दिशा देत आहे.

चेन्नईच्या मातीत जन्म झाला असला तरी, सांगलीच्या खानापूर तालुक्यातील मातीची ओढ त्यांच्या रक्तात आहे. तामिळ, मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा भाषांच्या संगमातून त्यांना जे बहुभाषिक व्यक्तिमत्त्व लाभले, त्यामुळेच त्यांना समाजाच्या विविध स्तरांतील लोकांशी संवाद साधणे सहज शक्य झाले. पण हा केवळ संवाद नव्हता, तर ती नाती जोडण्याची एक कला होती.

डॉक्टर (बी.डी.एस.) म्हणून रुग्णांच्या वेदना समजून घेण्याचे कसब त्यांनी आत्मसात केले. मात्र, केवळ क्लिनिकपुरते मर्यादित न राहता, समाजातील मोठ्या व्यवस्थेत बदल घडवण्यासाठी त्यांनी शिक्षणाची कास धरली. 'सिम्बायोसिस' मधून एम.बी.ए. आणि 'हार्वर्ड बिझनेस स्कूल' सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेतून नेतृत्व गुणांचे धडे गिरवले. पुण्यातील 'टी.ए.एस. स्कूल' मध्ये सी.ई.ओ. म्हणून काम करताना त्यांनी राबवलेली 'प्रणाली-आधारित कामकाज' पद्धती ही त्यांच्या प्रगल्भ विचारांची साक्ष देते.

स्वातंत्र्यसैनिक स्व. भाऊसाहेब थोरात यांचा त्यागी वारसा, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांची संयमी वृत्ती आणि माजी नगराध्यक्षा सौ. मी दुर्गाताई तांबे यांची प्रशासकीय पकड, अशा दिग्गज नेतृत्वांचे मार्गदर्शन मैथिलीताईंना लाभले. सत्यजीत तांबे यांच्यासोबतच्या सहजीवनातून त्यांना राजकारण हे सत्तेचे माध्यम नसून समाजसेवेचे साधन असल्याची प्रचिती आली.

'आय लव्ह संगमनेर' आणि 'जयहिंद लोकचळवळ' या माध्यमातून त्यांनी महिलांचे बचत गट, युवकांचे कौशल्य आणि बालकांचे भविष्य घडवण्यासाठी जे काम केले, त्यातूनच खऱ्या अर्थाने त्या जनसामान्यांच्या मैथिलीताई झाल्या.

आज संगमनेरच्या नगराध्यक्षा म्हणून काम करताना, त्यांच्यातली 'डॉक्टर' संवेदनशीलता जपते, तर 'मॅनेजर' कामाची गती आणि अचूकता पाहते. त्यांचे स्वप्न केवळ रस्ते आणि इमारतींचे शहर उभारणे नाही, तर एक 'नागरिककेंद्रित आणि तंत्रज्ञानस्नेही' संगमनेर घडवणे हे आहे. स्वच्छता, महिला सुरक्षा आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्या अहोरात्र झटत आहेत.

हा प्रवास पद किंवा प्रतिष्ठेचा नसून, तो एका विश्वासाचा आहे, जो संगमनेरच्या जनतेने माझ्यावर टाकला आहे, असे त्या जेव्हा म्हणतात, तेव्हा त्यातील प्रामाणिकपणा काळजाला भिडतो.

आज वाढदिवसानिमित्त मैथिलीताईंना उदंड आयुष्य लाभो, हीच सदिच्छा! त्यांच्या रूपाने संगमनेरला लाभलेले हे सुशिक्षित आणि दूरदृष्टीचे नेतृत्व शहराला प्रगतीच्या शिखरावर नेईल, यात शंका नाही!

**– समीर कडलग**
**संगमनेर**

# कुरकुंडी फाट्यावर शेतकऱ्याला जमावाकडून मारहाण



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

गाडीला कट का मारला आणि थांबला का नाही, असे विचारून दोघांसह तीन अनोळखी इसमांनी एका शेतकऱ्यास शिवीगाळ, दमदाटी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची साखळी आणि खिशातील तीस हजार रुपये काढून घेतल्याची घटना पठारभागातील कुरकुंडी फाट्यावर शुक्रवारी (दि. २४) सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी घारगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की हिवरगाव पावसा येथील शेतकरी विजय सदाशिव पावसे (वय ३०) हे त्यांच्या शेतातील फुले विक्रीसाठी घारगाव येथील हॉटेल लक्ष्मीजवळ घेऊन येतात व तेथून मुंबईला आळेफाटा येथील एक चालक घेऊन जात असतो. दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास ते फुले घेऊन हॉटेल लक्ष्मीजवळ आले असता, गाडी वळवत असताना तेथून दोघे चालले होते. ते म्हणाले, आम्हांला कट का मारला? तेव्हा पावसे म्हणाले, मी गाडी वळवत होतो, कट मारला नाही. त्यावर दोघे शिवीगाळ व दमदाटी करू लागल्याने गाडी घेऊन आळेफाट्याच्या दिशेने निघाले.

दरम्यान, कुरकुंडी फाट्यावर दोन मोटारसायकलींवर पाच जण आले आणि म्हणाले, तू हॉटेल लक्ष्मीजवळ का थांबला नाही? त्यावर तुम्ही दमदाटी करू लागल्याने मी थांबलो नाही, असे पावसे यांनी सांगितले. तेव्हा त्यातील एक इसम म्हणाला, श्री पत्रकार गणेश आहेर, आणि गाडीच्या काचावर हाताने मारले. तर दुसरा इसम म्हणाला, मी राजवर्धन पिसाळ असून घारगावमधील आहे. तू आमच्या गाधात फुलाची गाडी घेऊन येतो, पुन्हा आला तर हातपाय तंगड्या तोडून टाकू व जीवे ठार मारू, अशी धमकी दिली.

ते एवढ्यावरच थांबले नाही, तर पाचही जणांनी शिवीगाळ, दमदाटी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यामध्ये गणेश आहेर याने पावसे यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची साखळी (दोन लाख रुपये) आणि खिशातील तीस हजार रुपये काढून घेतले. याप्रकरणी विजय पावसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरील पाच जणांवर घारगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे.

# किचनमधील आगीत ५५ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

शहरातील बाजारपेठ परिसरात घडलेल्या एका अत्यंत दुर्दैवी घटनेत किचनमध्ये लागलेल्या आगीत गंभीर भाजलेल्या ५५ वर्षीय महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. राखी अतुल शहा (वय ५५) असे मृत महिलेचे नाव असून त्या पार्श्वनाथ जैन समाजाचे अध्यक्ष अश्विन शहा यांच्या भावजयी होत.

मिळालेल्या माहितीनुसार, घरातील किचन ओट्यावर सांडलेले तेल पुसण्यासाठी त्या कापडाचा वापर करत होत्या. याचदरम्यान गॅस सुरू असल्याने तो बंद करण्याच्या प्रयत्नात कापडाने अचानक पेट घेतला, आणि काही क्षणातच आगीचा भडका उडाला. या भीषण आगीत त्यांच्या चेहऱ्यासह शरीराचा मोठा भाग गंभीररीत्या भाजला गेला.

घटनेनंतर त्यांना तातडीने संगमनेर येथील मेडिकोव्हर रुग्णालय, तसेच धन्वंतरी क्लिनिक येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दुर्दैवाने, वेळेत योग्य आणि प्रभावी उपचार न मिळाल्याने त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, सर्वत्र शोककळा पसरली आहे. सोमवार (दि. २७) रोजी दुपारी अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्वभावाने अत्यंत शांत, धार्मिक आणि मनमिळावू असलेल्या श्रीमती राखी शहा या परिसरात सहकार्यशील वृत्तीमुळे सर्वांच्या परिचयाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती अतुल शहा, मुलगा सौरभ, आशय, भाऊ, पुतणे आणि मोठा परिवार आहे.

# माजी मंत्री थोरातांच्या प्रयत्नातून सावरगाव घुले बेलसोंडा वस्तीचा पाणी प्रश्न मार्गी



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील सर्व गावांमध्ये विकास कामांच्या योजना राबवण्याबरोबर पिण्याचा पाण्याचा प्रश्न लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने मार्गी लावला आहे. बेलसोंडा वस्तीवरील पाणीपुरवठा योजनेसाठी मदत करून या नागरिकांच्या पिण्याचा प्रश्न लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सोडवला असून, यामुळे नागरिकांमध्ये मोठे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पठार भागातील सावरगाव घुले येथील बेलसोंडा वस्तीचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने वाटचाल करत असून, ग्रामपंचायत, लोकसहभाग आणि लोकप्रतिनिधींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणीटंचाईच्या तीव्र पार्श्वभूमीवर या वस्तीला पाईपलाईनची अत्यंत गरज होती. ग्रामपंचायतीकडे काही निधी उपलब्ध असला, तरी उर्वरित निधी उभारण्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता भासत होती.

याच अनुषंगाने वस्तीतील महिलांनी पुढाकार घेत युवक नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांची भेट घेतली. आमच्या वस्तीला पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी भावनिक मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली. महिलांच्या या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत डॉ. जयश्रीताईंनी तात्काळ प्रतिसाद देत पाईपलाईन कामासाठी मदत केली. त्यांच्या या तत्पर निर्णयामुळे रखडलेला पाणीप्रश्न सुटण्यास मोठी चालना मिळाली आहे.

लवकरच सावरगाव घुले ग्रामपंचायतीमार्फत पाईपलाईनची कामे सुरू करण्यात येणार असून, बेलसोंडा वस्तीतील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून महिलांना डोक्यावर हंडे घेऊन लांब अंतरावरून पाणी आणावे लागत होते. मात्र, आता ही कष्टप्रद परिस्थिती संपुष्टात येणार असल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

माजी सरपंच बाबाजी दगडू घुले यांनी सांगितले की, महिलांच्या डोक्यावरील हंडा आता कायमचा उतरणार असून, हा आमच्यासाठी मोठा दिलासा आहे. विशेष म्हणजे १९७२ पासून सुरू असलेली टँकर व्यवस्था लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यामुळे आता कायमची बंद होण्याच्या मार्गावर आहे, ही या भागासाठी ऐतिहासिक बाब ठरणार आहे.

या उपक्रमासाठी सावरगाव घुले ग्रामपंचायत, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि डॉ. जयश्रीताई थोरात यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले. पठार भागातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी बाळासाहेब थोरात यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत डॉ. जयश्रीताईंनीही तत्परतेने मदत करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

यावेळी बोटा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य अजय फटांगरे यांच्यासह रंजना घुले, अर्चना घुले, विद्या घुले, अलका घुले, शोभा घुले, चारुशीला घुले, जयश्री घुले, भिंबाई घुले, जनाबाई घुले, लता घुले, निर्मला घुले, वत्सला घुले यांसह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी डॉ. जयश्रीताई थोरात यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

# मालदाडच्या मखऱ्या डोंगरावर पेटला वणवा, १०० हेक्टर क्षेत्र बाधित



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील मालदाड येथील सर्वांत उंच तसेच गावाची शान मानल्या जाणाऱ्या मखऱ्या डोंगराला कऱ्हे गावाच्या बाजूने अज्ञात विकृत मानसिकतेच्या व्यक्तीने आग लावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रविवारी दुपारी भर उन्हात लागलेल्या या भीषण वणव्यामुळे जवळपास १०० हेक्टर क्षेत्रातील झाडे, झुडुपे आणि नैसर्गिक वनसंपदेची हानी झाली असून, या परिसराचे मोठे पर्यावरणीय नुकसान झाले आहे.

या आगीत केवळ वनसंपदाच नाही, तर वन्यजीवांनाही मोठा फटका बसला आहे. डोंगर परिसर जळत असताना अनेक वन्य प्राण्यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला. विशेषतः सरपटणारे प्राणी अक्षरशः होरपळून मृत्युमुखी पडल्याचे दुर्दैवी चित्र दिसून आले. तसेच पक्ष्यांची घरटीही आगीत जळून खाक झाली, त्यामुळे जैवविविधतेवर मोठा आघात झाला आहे. हा वणवा विझवण्यासाठी वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते; मात्र त्यांची संख्या अत्यंत अपुरी होती. अग्निशमनासाठी आवश्यक साधनसामग्रीही कमी असल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. अशा कठीण परिस्थितीत स्थानिक नागरिक आणि तरुणांनी पुढाकार घेत, जीवाची पर्वा न करता ओल्या झुडुपांच्या फांद्यांनी आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न करून वणवा आटोक्यात आणला.

या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने या प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने दखल घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. ज्या व्यक्तीने हा वणवा लावला, त्याचा तात्काळ शोध घेऊन कठोरात कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कडक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. अशा घटनांमुळे वृक्षसंपदा जोपासना करून वृक्ष लागवड चळवळीत सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांच्या मनोधैर्यावर वाचा परिणाम होत आहे.

मानवाच्या स्वार्थापोटी जंगलांचा होत असलेला नाश ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी जंगलांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. अन्यथा, येणाऱ्या काळात याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल देणे आहे



सगंमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा
डॉ. मैथिलीताई सत्यजीत तांबे
आपणास जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा..!
- शुभेच्छुक -
सौरभ विवेक कासार
नगरसेवक, संगमनेर नगरपरिषद
संचालक, किसान कृषी सेवा केंद्र, संगमनेर

सगंमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा
डॉ. मैथिलीताई सत्यजीत तांबे
आपणास जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
ॲड. अमोल बोऱ्हाडे
संस्थापक/अध्यक्ष,
साई अर्पण उद्योग समुह
अमोल डेकोर प्रा. लि. संगमनेर
मा. भारत बोऱ्हाडे
नगरसेवक
संगमनेर न. प. संगमनेर

सगंमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा
डॉ. मैथिलीताई सत्यजीत तांबे
यांना
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा !
शुभेच्छुक
किरण गुंजाळ — संचालक, आर्या होल डिग्गर ट्रॅक्टर
शिवाजीराजे गुंजाळ — संचालक, साईगणेशा डेव्हलपर्स भोळेबाबा पतसंस्था
अनिल गुंजाळ — संचालक, साईगणेशा डेव्हलपर्स, सामाजिक कार्यकर्ते
सोमनाथ यादव — संचालक, साईगणेशा डेव्हलपर्स

सगंमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा
डॉ. मैथिलीताई सत्यजीत तांबे
यांना
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा !
शुभेच्छुक
कैलास दादा गुंजाळ
जितेंद्र कैलास गुंजाळ
लक्ष्मी माता फॅब्रिकेशनॲण्ड वेल्डींग वर्क्स, गुंजाळवाडी

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग — १० जागा
टेली कॉलिंग — १० जागा
सेल्स ऑफिसर — ०५ जागा
ड्रायव्हर — ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

सगंमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा
डॉ. मैथिलीताई सत्यजीत तांबे
आपणास जन्मदिनाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
सौ. शोभा बाळासाहेब पवार
नगरसेवक, संगमनेर न. प. संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयू
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
१ लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
KH
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25